

आजम भाई पानसरे यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी महाआरोग्य शिबिर

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3 रे

www.metrocityvrutant.in | मंगळवार दिनांक ११/02/२०२५ | METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 47 || RNI - MAHMAR/2021/51259 || metrocity924@gmail.com


# शिंदे साहेबांचा राजकीय प्रवास नेहमीच प्रेरणादायी

## इरफानभाई सय्यद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : 'सामान्य कार्यकर्ता ते लोकांचा लोकनाथ' हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांचा प्रवास माझ्यासारख्या तमाम शिवसैनिकांना जनसेवेची प्रेरणा देतो. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि गुरुवर्य धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या मुशीत तयार होण्याचं भाग्य या रत्नास लाभल. या परीसाच्या सहवासात अनेक दिग्गज नेते आणि कार्यकर्ते घडले. असंख्य कार्यकर्त्यांना मोठी पद देऊन त्यांनी त्यांचा सन्मानही केला. मी सुद्धा एक सामान्य कामगार नेता होतो. मला शिंदे साहेबांनी उपनेता बनवलं. ही माझ्या कामाची पावती आहे, अशी भावना कामगार नेते तथा शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद यांनी व्यक्त केली.**

राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदेसाहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शिरूर लोकसभा मतदारसंघात विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसैनिकांना संबोधित करताना इरफानभाई सय्यद बोलत होते. दरम्यान कार्यकर्त्यांनी



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसैनिकांच शक्तीप्रदर्शन..

आगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मतदारसंघात जोरदार शक्तिप्रदर्शन केले. तसेच पिंपरी-चिंचवड महापालिकेवर भगवा फडकवण्याचा संकल्पही यावेळी केला.

कार्यक्रमास शिवसेना जिल्हाप्रमुख भगवानशेठ पोखरकर, युवासेना जिल्हाप्रमुख धनंजय पठारे,भोसरी विधानसभा प्रमुख संभाजी शिरसाट, युवासेना उपजिल्हाप्रमुख अरुण जोगदंड, महिला संघटीका मनिषा परांडे,संदिप जाधव,संकेत चावरे,दत्ता औराळे,नुर शेख,आशिष गौंड,रोहीत जगताप,नागेश हनवटे,समर्थ नायकवडे,अमित पासलकर,बबन काळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी व शिवसेना अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना इरफानभाई म्हणाले, मुख्यमंत्रीपदी विराजमान असताना एकनाथ शिंदे साहेबांनी जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतले. त्यात विशेष लोकप्रिय झाली ती 'लाडकी बहिण योजना'. या योजनेमुळे कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि घरातील बहिणींचे ते आज लाडके भाऊ झालेत. मोठ्या पदावर राहुन देखील त्यांच्यातील एका सामान्य कार्यकर्त्याने नेहमीच जनसेवकाची भुमिका पार पाडली. राजकारणात येणाऱ्या नव्या पिढीला त्यांचा राजकीय प्रवास नेहमीच प्रेरणादायी राहील.

दरम्यान वाढदिवसानिमित्त श्रेयश ऑप्टिशियन्सच्या सहकार्यातुन शहरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रूपीनगर येथील नवमहाराष्ट्र विद्यालय, प्रबोधनकार ठाकरे शाळा, अजंठानगरची माता रमाबाई भीमराव आंबेडकर प्राथमिक शाळा येथील विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. दिघी येथे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या वतीने मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नागरिकांची आरोग्य तपासणी, गोळ्या-औषधांचे वाटप, कृत्रिम अवयव, मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या. आळंदी शहरात महिलांना परंपरा आणि एकतेला प्रोत्साहन मिळावे यासाठी हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

# आजपासून बारावीची परीक्षा, राज्यभरातून 15 लाख विद्यार्थी देणार परीक्षा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या माध्यमांतून राज्यभरात आज ११ फेब्रुवारी २०२५ पासून बारावीची सुरू होत आहे. या परीक्षेला १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी बसले आहेत. तर यामध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले, ६ लाख ९४ हजार ६५२ मुली, तर ३७ ट्रान्सजेंडर परीक्षा देणार आहेत. अशी माहिती मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. तर १० हजार ५५० कनिष्ट महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांची नोंदणी झाली असून ३ हजार ३७३ मुख्य केंद्रावर परीक्षा होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी शरद गोसावी म्हणाले, पुणे, नागपूर, संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळाअंतर्गत १२ वीच्या परीक्षेला आज पासून सुरुवात होत आहे. यंदाच्या वर्षी बारावीची परीक्षा १० दिवस अगोदर होत आहे. ही परीक्षा लवकर घेतल्याने निकाल लवकर लागेल. १५ मे पर्यंत बारावी आणि दहावीचा निकाल लागण्याची शक्यता आहे.

राज्यभरात यंदा १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी बसले आहेत.त्यामध्ये विज्ञान शाखेला ७ लाख ६८ हजार ९६७ विद्यार्थी, कला शाखेला ३ लाख ८० हजार ४१० विद्यार्थी, वाणिज्य शाखेला ३ लाख १९ हजार ४३९ विद्यार्थी तर किमान



कौशल्य आधारित अभ्यासक्रम ३१ हजार ७३५ विद्यार्थी टेक्निकल सायन्स ४ हजार ४८६ असे एकूण १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी परीक्षा देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच ते पुढे म्हणाले, परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळामार्फत संपूर्ण राज्यात २७१ भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली. तर मागील पाच वर्षाच्या काळात ८१८ केंद्रावर सातत्याने गैरप्रकार आढळून आले आहेत. त्यामुळे ती सर्व केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आली आहे. त्याबाबत सांगायचे झाल्यास, पुणे १२५, नागपूर १०४, छत्रपती संभाजीनगर २०५, मुंबई ५७, कोल्हापूर ३९, अमरावती १२४, नाशिक ८८, लातूर ७३, कोकण ३ ही एकूण ८१८ केंद्र आहेत. या सर्वांवर विशेष लक्ष मंडळाचे असणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक ११/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिस्तूल बाळगणारा सराईत गजाआड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : देशी बनावटीचे पिस्तूल बाळगणाऱ्या सराइताला पोलिसांनी कर्वेनगर भागातून अटक केली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल, दोन काडतुसे जप्त करण्यात आली. कुणाल सचिन घावरे (वय २८, रा. बराटे कॉलनी, कर्वेनगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

कर्वेनगर भागात वारजे माळवाडी आणि गुन्हे शाखा युनिट तीनचे पथक गस्त घालत होते. त्या वेळी कर्वेनगर भागातील डीपी रस्त्यावर घावरे थांबला होता. त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती पोलीस कर्मचारी प्रतीक मोरे यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने सापळा लावून त्याला पकडले. त्याच्याकडून पिस्तूल आणि दोन काडतुसे जप्त करण्यात आली. घावरे याच्याविरुद्ध बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्याने पिस्तूल का बाळगले, या दृष्टीने पोलिसांकडून तपास करण्यात येत आहे.

पोलीस उपायुक्त संभाजी कदम, गुन्हे शाखेचे सहायक आयुक्त गणेश इंगळे, कोथरूड विभागाचे सहायक आयुक्त भाऊसाहेब पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे, गुन्हे शाखा युनिट तीनचे पोलीस निरीक्षक रंगराव पवार, पोलीस निरीक्षक नीलेश बडाख, उपनिरीक्षक संजय नरळे, विनोद भंडलकर, विनोद जाधव, गणेश सुतार यांनी ही कामगिरी केली.

# जनसंवाद सभेत एकूण ८२ सूचना प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : महापालिकेच्या वतीने आज घेण्यात आलेल्या जनसंवाद सभेत नागरिकांनी एकूण ८२ तक्रार वजा सूचना मांडल्या. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. या अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयात नियुक्त करण्यात आलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी जनसंवाद सभेचे अध्यक्षस्थान भूषविले.

आज झालेल्या जनसंवाद सभेत नागरीकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे १६, ६, ६, १३, ५, ३, १४ आणि १९ याप्रमाणे एकुण ८२ तक्रारी वजा सुचना महापालिकेस प्राप्त झाल्या.

यावेळी रस्त्याच्या कडेला लावण्यात आलेल्या वृक्षांची निगा राखणे, बंद असलेल्या विजेच्या खांबावरील लाईट दुरुस्त करणे, फुटलेले चेंबर दुरुस्त करणे, राडारोडा उचलणे, रस्त्यावर पाणी साचू नये यासाठी योग्य ती उपाययोजना करणे, शहरात विविध ठिकाणी धुरीकरण, औषध फवारणी करणे, स्वच्छता गृहांची स्वच्छता करणे, रस्त्यावरील खड्डे बुजवणे यासारख्या विविध तक्रारी नागरिकांनी मांडल्या.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने घेण्यात येणाऱ्या जनसंवाद सभेसाठी मुख्य समन्वय अधिकाऱ्यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात आदेश सामान्य प्रशासन विभागामार्फत निर्गमित करण्यात आले आहे. शहरातील नागरिक आणि प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी तसेच तक्रारींचे निवारण जलदगतीने करण्यासाठी आठही क्षेत्रीय कार्यालयात जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते.

# आजम भाई पानसरे यांच्या वाढदिवसा निमित्त बुधवारी महाआरोग्य शिबिर



पिंपरी : पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठ नेते तथा माजी महापौर आझम भाई पानसरे यांच्या वाढदिवसानिमित्त, कै. फकीरभाई पानसरे एज्युकेशन फाउंडेशन संचलित लोकमान्य होमिओपॅथिक हॉस्पिटल व कॉलेज वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार (दि. १२) फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते दोन या वेळेत हे आरोग्य शिबिर संपन्न होत आहे. यामध्ये मोफत होमिओपॅथिक उपचार व औषध वाटप, मोफत फिजिओथेरपी, मोफत हाडांची घनता चाचणी, मोफत नेत्र तपासणी, मोफत रक्तातील साखर व हिमोग्लोबिन चाचणी इत्यादी प्रकारच्या चाचण्या या आरोग्य शिबिरात होणार असून या आरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. सदर आरोग्य शिबिर कै. फकीरभाई पानसरे एज्युकेशन फाउंडेशन संचलित लोकमान्य होमिओपॅथिक हॉस्पिटल आणि लाईफ ब्रिज हॉस्पिटल कॉर्नर सर्वे नंबर ३+२ वालेकरवाडी, श्रीकृष्ण हॉटेल, साठे कॉलनी या ठिकाणी संपन्न होत आहे.

# पंतप्रधान इंटर्नशिप योजनेत नोंदणी करण्यासाठी पीसीसीओईमध्ये नोंदणी शिबिराचे आयोजन

पिंपरी (प्रतिनिधी)



रोटरी क्लब ऑफ उद्योगनगरी, पिंपरी तर्फे "रोटरी गौरव २०२५ - वित्तीय सेवा" हा पुरस्कार जेष्ठ अर्थतज्ञ चंद्रशेखर टिळक यांना रोटरी डिस्ट्रिक ३१३१ चे नियोजित प्रांतपाल रो.नितीन ढमाले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने रोटरी क्लब ऑफ उद्योगनगरी पिंपरी आणि आय. सी. ए. आय. पिं-चिं शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रशेखर टिळक यांचे "अमृतकाळातील केंद्रीय अर्थसंकल्प" या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. भारताच्या अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणारा व जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेला मजबूती देणारा अर्थसंकल्प आहे, असे मत अर्थतज्ञ चंद्रशेखर टिळक यांनी व्यक्त केले. संरक्षण आणि पर्यटन या क्षेत्रातील विविध घडामोडींवर चंद्रशेखर टिळक यांनी आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ उद्योगनगरी, पिंपरीचे अध्यक्ष रो.प्रशांत शेजवळ, क्लब चे सचिव रो.वैभव गवळी तसेच आयसीएआय पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष सीए पंकज पाटणी, माजी अध्यक्ष सीए संतोष संचेती व विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन रो. प्रमोद जाधव, सूत्रसंचालन सीए ललित बडगुजर व आभार प्रदर्शन वैभव गवळी यांनी केले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक ११/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# अनधिकृत आरएमसी प्लांट त्वरित बंद करण्यात यावेत : आमदार शंकर जगताप

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, शहरातील अनधिकृत रेडी मिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्लांट्समुळे वाढत्या हवा आणि ध्वनी प्रदूषणाचा नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

अनेक ठिकाणी पर्यावरण विभागाची परवानगी न घेता हे प्लांट सुरू असल्याने श्वसनाचे विकार वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर, चिंचवड मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांनी



महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देऊन अशा अनधिकृत प्लांट्सवर तातडीने कारवाई करण्याची आणि ते त्वरित बंद करण्याची मागणी केली आहे.

चिंचवड मतदारसंघात मोठ्या प्रमाणावर गृहप्रकल्प सुरू असून, बांधकामांसाठी रेडी मिक्स कॉंक्रिट (आरएमसी) प्लांट्स वापरले जात आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात हवा आणि ध्वनी प्रदूषण होत आहे. त्याचा नागरिकांना त्रास होत आहे. या पार्श्वभूमीवर, आमदार शंकर जगताप यांनी ही मागणी केली आहे.आरएमसी प्लांट्समुळे सतत मोठ्या प्रमाणावर धूळ हवेत पसरत असल्याने नागरिकांना श्वसनासंबंधी त्रास होण्याची शक्यता आहे.

तसेच, हे प्लांट्स रात्रंदिवस सुरू असल्याने मोठ्या वाहनांची वर्दळ आणि मशीनच्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषण वाढले आहे. विशेषतः लहान मुले, वृद्ध आणि श्वसनाचे विकार असणाऱ्या नागरिकांना याचा जास्त त्रास सहन करावा लागत आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे उल्लंघन करून चालू असलेल्या या आरएमसी प्लांट्सवर तातडीने कारवाई करण्यात यावी, तसेच परवानगीशिवाय चालणारी सर्व प्लांट्स तात्काळ बंद करण्यात यावीत, अशी मागणी आमदार जगताप यांनी केली आहे.

# पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी आराखडा बनविणार - पंकजा मुंडे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : नद्या, तलाव यांच्या प्रवाहात सांडपाणी मिसळू नये, सांडपाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी पर्यावरण विभाग सर्वसमावेशक आराखडा बनवणार असून, नद्यांच्या काठावरील ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका यांच्या कार्यक्षेत्रात प्रदूषण नियंत्रणासाठी, प्रदूषित पाण्याचा पुनर्वापर नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाच्या मदतीने करण्यासाठी तांत्रिक कक्षाची स्थापना करण्याची घोषणा पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी केली.

आयआयटी पवई येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग , महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व आयआयटी, पवई यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक स्वराज्य संस्था प्रामुख्याने नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात सांडपाण्याचे व्यवस्थापन व शाश्वत उपाययोजना (मुन्सिपल वेस्ट वॉटर मॅनेजमेंट गॅप्स, सस्टेनबिलिटी अँड वे फॉरवर्ड) या विषयावर एक दिवसाची परिषद आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमात पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे बोलत होत्या.

यावेळी नगर विकास (२) विभागाचे प्रधान सचिव के.एच. गोविंदराज,



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे, आयआयटी पवईच्या पर्यावरण विभाग व इंजिनिअरिंगचे प्रोफेसर मुनेश कुमार चंदेल, प्रोफेसर अनिल कुमार दीक्षित, राज्यातील महानगरपालिका,नगरपालिका या क्षेत्रातील प्रदूषण नियंत्रण अधिकारी तथा तंत्रज्ञ या कार्यशाळेला उपस्थित होते.

पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, ग्रामपंचायती,नगरपालिका महानगरपालिका या क्षेत्रातून वाहणाऱ्या नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणात त्या त्या स्थानिक भागातील प्रदूषित पाणी या नद्यांमध्ये थेट मिसळले जाते. प्रदूषित पाणी मिसळल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत आहेत. प्रदूषित पाणी थेट पाण्याच्या प्रवाहामध्ये मिसळू नये यासाठी उपाययोजना करणे गरजेचे आहे. नद्या व तलावांचे संवर्धनही भविष्याची गरज ओळखून त्याचा सुनियोजित तांत्रिक आराखडा पर्यावरण विभागाकडून बनवला जाणार आहे. तसेच या क्षेत्रामध्ये लोकांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान माहिती होण्यासाठी पर्यावरण विभाग एक तांत्रिक कक्ष देखील स्थापन करून करून त्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रशिक्षण देणार आहे. जेणेकरून प्रदूषणाच्या उपाययोजना काटेकोरपणे राबवता येतील असेही मंत्री मुंडे म्हणाल्या.

# वना धरणात किती आहे पाणीसाठा ?



पिंपरी : उन्हाचा चटका वाढला असून, पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठा कमी होऊ लागला आहे. सध्या ६३.९२ टक्के पाणीसाठा असून, हा पाणीसाठा १५ जूनपर्यंत पुरेल एवढा आहे. त्यामुळे पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन पाटबंधारे विभागाने केले आहे. शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे. शहराची लोकसंख्या वाढत असल्यामुळे पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. मावळातील पवना धरणातून ५१०, आंद्रा धरणातून ८०, एमआयडीसीकडून २० असे ६१० दशलक्ष लीटर (एमएलडी) एका दिवसाला शहराला पाणी पुरवठा केला जात आहे. भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लिटर पाणी आणण्याचे नियोजन आहे. त्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाला वेग आला असून, डिसेंबर २०२५ अखेर या जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याचा मानस महापालिका प्रशासनाचा आहे. मागील काही दिवसांपासून शहर आणि मावळातील पवना धरण परिसरात उन्हाचा चटका वाढू लागला आहे. पाण्याची मागणी वाढण्यास सुरुवात झाली आहे. उन्हामुळे बाष्पीभवनही होत आहे. त्यामुळे धरणातील पाणी पातळी घटू लागली आहे. पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहरासह महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), मावळ तालुक्यातील काही ग्रामपंचायत व नगरपरिषदेला पाणी दिले जाते. सध्या पवना धरणात ६३.९२ टक्के पाणीसाठा आहे. गेल्यावर्षी आतापर्यंत धरणात ६२.९१ टक्के पाणीसाठा होता. त्यामुळे यंदा गतवर्षीपेक्षा १.१ टक्के इतका अधिक पाणीसाठा धरणात शिल्लक असून, शहरवासीयांना सध्यातरी पाण्याची चिंता नाही. दरम्यान, आंद्रा धरणातूनही महापालिका पाणी घेत असून, या धरणात ६५ टक्के पाणीसाठा आहे.

# पंतप्रधान इंटर्नशिप योजनेत नोंदणी करण्यासाठी पीसीसीओईमध्ये नोंदणी शिबिराचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे पीसीसीओईमध्ये भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाद्वारे "पंतप्रधान इंटर्नशिप योजना" संबंधित माहितीसत्र व ऑनलाईन नोंदणी शिबिराचे मंगळवारी (दि. ११ फेब्रुवारी) सकाळी ९ वाजता आयोजन करण्यात आले आहे त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन पीसीईटीच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी केले आहे. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे (पीसीईटी) पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग (पीसीसीओई) येथील सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या आयसीएलएस विभागाचे अधिकारी उपस्थित राहून या योजनेची माहिती देणार आहेत. तसेच अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांची व गेल्या तीन वर्षात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची या योजनेत ऑनलाईन नोंदणी देखील करून घेण्यात येणार आहे. "पंतप्रधान इंटर्नशिप योजना" ही भारत सरकारची एक महत्वपूर्ण योजना आहे. या योजनेअंतर्गत २१ ते २४ वयोगटातील तरुणांना देशातील सुमारे ५०० अग्रगण्य कंपन्यांमध्ये सुमारे एक कोटी इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध होणार असून दरमहा शिष्यवृत्ती मिळणार आहे. या योजनेचा मुख्य उद्देश तरुणांना उद्योग क्षेत्रात लागणाऱ्या कौशल्यांनी सुसज्य करून नोकरीसाठी तयार करणे व त्यांच्या करिअरला चालना देणे हा आहे. अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांबरोबरच विज्ञान, कला, वाणिज्य, बीसीए, बीसीएस, व्यवस्थापनशास्त्र या शाखेतील (उत्तीर्ण झालेले किंवा अंतिम वर्षातील) पदवीधर, पदविकाधारक (डिप्लोमा), आयटीआय, बारावी उत्तीर्ण, दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या माहितीसत्रात सहभागी होऊन "पंतप्रधान इंटर्नशिप योजनेचा" लाभ घ्यावा असे आवाहन पीसीईटीच्या सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शीतलकुमार रवंदळे यांनी केले आहे. सहभागी होण्याकरिता खालील लिंक वर रजिस्ट्रेशन करावे :https://tinyurl.com/PMinternship22 या कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई व प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले आहे.

# खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी मोटारचालक अटकेत

पुणे : पुणे-सोलापूर रस्त्यावरील भैरोबानाला चौकात मोटारीने दुचाकीस्वार तरुणाला धडक दिली. दुचाकीस्वार तरुणाने मोटारीचे छायाचित्र मोबाइलवर काढल्यानंतर मुजोर मोटारचालकाने त्याच्या अंगावर मोटार घातली. तरुणाला एक किलोमीटर फरफटत नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी वानवडी पोलिसांनी खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी मोटारचालकाला अटक केली. राजीव कृष्णकुमार बर्मन (वय ६०, रा. सेक्रेड हार्ट टाऊन सोसायटी, वानवडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत अभिजित येडुबा गोलाइत (वय ३०, रा. हेवन पार्क सोसायटी, अवधूत रेसीडन्सी, आझादनगर, महंमदवाडी रस्ता, हडपसर) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे-सोलापूर रस्त्यावरुन दुचाकीस्वार गोलाइत शनिवारी रात्री नऊच्या सुमारास निघाले होते. भैरोबानाला चौकात मोटारीने पाठीमागून दुचाकीस्वार गोलाइत यांना धडक दिली. गोलाइत यांनी दुचाकी रस्त्यच्या कडेला लावली आणि मोबाइलमधील कॅमेऱ्याने छायाचित्र काढले. मोबाइलवर छायाचित्र काढणाऱ्या गोलाइत यांच्या अंगावर मोटारचालक बर्मन यांनी मोटार घातली. प्रसंगावधान राखून गोलाइत मोटारीच्या बोनेटवर चढले. त्यानंतर बर्मन यांनी मोटार तशीच पुढे नेली. भैरोबानाला चौक ते ९३ अॅव्हेन्यू मॉल चौकापर्यंत गोलाइत यांना फरफटत नेले. या घटनेत गोलाइत यांना दुखापत झाली. मोटारीच्या धडकेत ज्येष्ठ महिला जखमी वारजे भागात मोटारीच्या धडकेत पादचारी ज्येष्ठ महिला जखमी झाल्याची घटना शनिवारी सायंकाळी घडली. याप्रकरणी मोटारचालक महिलेविरुद्ध वारजे माळवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मीनाक्षी जयवंत मारणे (वय ६२, रा. स्नेहा कॉम्प्लेक्स, वारजे माळवाडी) असे जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. याप्रकरणी एका मोटारचालक महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत मारणे यांनी फिर्याद दिली आहे. मारणे शनिवारी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास वारजे भागातून निघाल्या होत्या. सौंदर्या हॉटेलजवळ रस्ता ओलांडून पदपथावर जात असताना मोटारीने मारणे यांना धडक दिली. अपघातात मारणे जखमी झाल्या. पोलीस हवालदार डी. डी. देशमुख तपास करत आहेत.

# डी. एल. एड्. परीक्षेचा निकाल जाहीर

पुणे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत डिसेंबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या डी.एल.एड्. परीक्षेचा निकाल परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आला असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविली आहे.मराठी, उर्दू, हिंदी, इंग्रजी व कन्नड माध्यमाच्या परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या ४ हजार २८५ विद्यार्थ्यांपैकी ४ हजार २२९ विद्यार्थी परीक्षेसाठी उपस्थित होते. सर्व माध्यमातील एकूण २ हजार ४६१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांना निकालाचे मूळ गुणपत्रक संबंधित अध्यापक विद्यालयामार्फत यथावकाश हस्तपोच मिळणार असून उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकेची छायाप्रत मागणीसाठी २० फेब्रुवारी २०२५ पर्यंत अर्ज करता येईल, असेही श्रीमती ओक यांनी कळविले आहे.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक ११/02/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# एमआयटी-एडीटीला 'खेलो इंडिया'साठी 'साई'ची मान्यता

## रोइंग या क्रीडा प्रकारासाठी निवड होणारे राज्यातील एकमेव विद्यापीठ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणेः येथील एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाला रोइंग या क्रीडा प्रकारासाठी प्रतिभावान खेळाडूंचा (मुले व मुली) शोध घेणे व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) कडून खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र (निवासी) म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे, क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित 'साई'ची मान्यता मिळणारे एमआयटी एडीटी विद्यापीठ हे राज्यातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठातील क्रीडा संकुल हे जागतिक सोईसुविधांनी सुसज्ज आहे. विद्यापीठातील डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी स्पोर्ट्स अकादमीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षकांकडून रोइंग, बॉक्सिंग व जलतरण या खेळांसाठी अकादमीची स्थापना करत खेळाडूंना प्रशिक्षणाचे काम केले जाते. त्याच्या परिणामतः रोइंग अकादमीतील खेळाडूंनी आजवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना पदक जिंकूण विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. गतवर्षी विद्यापीठातील स्कूल ऑफ लॉ'चे प्रा.आदित्य केंदारींनी आशियाई इनडोअर रोइंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले होते. या कामगिरीनंतर



विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश कराड म्हणाले, विद्यापीठाच्या रोइंग अकादमीला आता खेलो इंडियासाठी साईची मान्यता मिळाल्याने या क्रीडा प्रकारात रुची असणाऱ्या पुणे व परिसरातील खेळाडूंना या खेळाच्या प्रशिक्षणासाठी हक्काचे ठिकाण उपलब्ध होणार आहे. या यशानंतर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभागाचे संचालक प्रा.पद्माकर फड यांनी क्रीडा विभागाचे अभिनंदन केले आहे.

**राज्य सरकारच्या लक्ष्य वेधसाठीही निवड**

'साई'सह महाराष्ट्र सरकारच्या क्रीडा मंत्रालयाच्या लक्ष्य वेध योजनेतही रोइंग क्रीडा प्रतिभा विकास प्रकाराचे प्रशिक्षण केंद्र म्हणून डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी स्पोर्ट्स अकादमीची निवड झाली आहे. तसेच, रोइंग खेळाडू म्हणून भाग्यश्री घुले, अनुष्का गर्जे आणि प्रशिक्षक म्हणून सुहास कांबळे यांना मान्यता मिळाली आहे.

# शहरवासियांनी आपल्या मुळ गावाची नाळ तोडू नये : प्रवीण दरेकर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : पोलादपूर मुळ निवासी पुणे शहरात वास्तव्यास असणाऱ्या शहरवासीयांनी आपल्या गावाची नाळ न तोडता शहरात आपल्या विकासासोबत गावाच्या ही विकासाचा विचार करावा असे प्रतिपादन पोलादपूर भूमिपुत्र प्रवीण दरेकर (आमदार- विधान परिषद, अध्यक्ष-मुंबई बँक) यांनी पोलादपूर तालुका रहिवासी संघातर्फे आयेजित भव्य सत्कार समारंभात बोलत होते. पोलादपूर तालुका रहिवासी संघातर्फे रविवारी सायंकाळी प्रवीण दरेकर यांच्या हस्ते माधुरीताई मिसाळ (राज्यमंत्री, महाराष्ट्र ) आणि संतोष मेढेकर (उद्योजक ) यांचा नरवीर तानाजी मालुसरे आणि सिंहगडची ऐतिहासिक प्रतिमा आणि शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास पोलादपूर तालुका रहिवासी संघ अध्यक्ष किसनजी भोसले, अरविंद चव्हाण




(कार्याध्यक्ष), सुनील कदम (उपाध्यक्ष), राजेंद्र मोरे (सचिव), सचिन पार्टे (सहसचिव), ज्ञानेश्वर साळुंखे (कोषाध्यक्ष), ज्ञानेश्वर साळुंखे (खजिनदार), डॉ. खरोसे (सह-कोषाध्यक्ष), शंकर खरोसे (हिशेबानी), लहू उतेकर (सह-हिशेबानी), राजू कदम (कार्यकारी प्रतिनिधी), ड.पांडुरंग जगदाळे (सल्लागर) आदी उपस्थित होते. पुढे बोलताना प्रवीण दरेकर म्हणाले की, "स्नेहसंमेलन, हळदी कुंकू कार्यक्रम दर वर्षी घेतले पाहिजे जेणेकरून कौटूंबिक जिव्हाळा निर्माण होतो . तसेच ज्या मातीतून आपण आलो त्यासाठीही पुणे मुंबई करांनी योगदान दिले पाहिजे. आमदार निधीतून पोलादपूर तालुका रहिवासी संघाचे भव्य कार्यालय बांधणसाठी उपलब्ध करून देवू असे" आश्वासन यावेळी दरेकर यांनी दिले. राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ म्हणाल्या की, "प्रत्येक यशस्वी पुरुषामागे स्त्रीचा हात असतो, त्याच पध्दतीने कोणताही कार्यक्रम यशस्वी करण्याच्या मागे ही महिलांचा हाथ असतो, तो आज ऐवढ्या मोठ्या प्रमाणात उपस्थित महिलांना पाहून दिसत आहे. महिला ज्या प्रमाणे हळदी कुंकू समारंभात एकत्रित येतात, अशाच पध्दतीने महिला सक्षमिकरणासाठी ही एकजूट होणे गरजेचे आहे".

पोलादपूर तालुका रहिवासी संघातर्फे आयोजित सत्कार समारंभ, स्नेहसंमेलन आणि हळदी कुंकू कार्यक्रमांस उदंड प्रतिसाद मिळला. यामध्ये सुमारे 4000 ते 4500 पोलादपूरवासी एकत्रित आले हाते. यावेळी खेळ पैठणीचा घेण्यात आला, यामध्ये 20 महिलांना पैठणी भेट देण्यात आली. तसेच पोलादपूरची प्रसिद्ध नथ भेट देण्यात आली. यामध्ये सुमारे 68 गावातील नागरिक सहभागी झाले होते. तसेच सुनंदा उपाळे, आशा कदम, छाया भोसले, जयश्री मोरे, सुनंदा पवार या जेष्ठ महिलांचाही सन्मान करण्यात आला.

